

ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# लिफण

वर्ष : १३ वे । अंक ३ रा ऑक्टोबर-नोव्हेंबर - डिसेंबर - २०२२

Scanned with CamScanner

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १३ वे, अंक - तिसरा; ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२२

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

● संपादक ●
डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९९०४००३९९८

Scanned with CamScanner

UGC Care Listed Journal, ISSN 2231 - 573X
साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

वर्ष १३ वे, अंक - तिसरा; ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२२

## ऊसतोड कामगार विशेषांक

### भाग-२

• संपादक •

डॉ. शिवाजी हुसे

• अतिथी संपादक •

डॉ. सुभाष शेकडे    डॉ. अशोक डोळस    डॉ. दिलीप बिरुटे

• संपादक मंडळ •

| | | |
|---|---|---|
| डॉ. सर्जेराव जिगे | डॉ. ताहेर पठाण | डॉ. प्रेमला मुखेडकर |
| डॉ. सुभाष बागल | डॉ. रामचंद्र झाडे | डॉ. रंजना कदम |
| डॉ. राजकुमार मुसणे | डॉ. दत्तात्रय डुंबरे | डॉ. सुखदेव इघारे |

मूल्य : २५० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९९०४००३९९८



Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेखाचे शीर्षक / लेखकाचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | **मराठी कवितेतील ऊस उत्पादक, कामगारांच्या व्यथा वेदना** - प्रा. रविंद्र डाखोरे | १ - ३ |
| २. | **मराठी साहित्य आणि ऊसतोड कामगार** - डॉ. राखी जाधव | ४ - ७ |
| ३. | **'ऊसकोंडी' - ऊसउत्पादक शेतकऱ्यांच्या 'कोंडी' मागील वास्तवाचा शोध** - डॉ. राजश्री कदम | ८ - १२ |
| ४. | **ऊसतोड कामगाराच्या उच्च शिक्षणातील समस्याः पारोळा तालुका संदर्भात** - डॉ. प्रदीप औजेकर | १३ - १७ |
| ५. | **ऊसतोड कामगारांच्या समस्या** - डॉ. प्रा. पराग मुरलीधर सपाटे | १८ - २३ |
| ६. | **कोयताः ऊसतोड कामगारांचे वास्तवदर्शी चित्रण करणारी कादंबरी** - प्रा डॉ निलेश एकनाथराव लोंढे | २४ - २९ |
| ७. | **मराठी कादंबरीतील ऊसतोड कामगार आणि त्यांच्या मुलांच्या व्यथा आणि वेदना** - प्रा. नामदेव महादू गावित | ३० - ३७ |
| ८. | **'गव्हानी' ऊसतोड कामगारांचे दुःखद जीवनानुभव मांडणारी लक्षवेधी कादंबरी** - प्रा. डॉ. मीनाक्षी रा. देव निमकर | ३८ - ४३ |
| ९. | **कन्नड सहकारी साखर कारखान्यातील ऊसतोड कामगारांच्या सामाजिक व आर्थिक समस्या एक अभ्यास** - डॉ. मीना मच्छिंद्रनाथ वडगुळे | ४४ - ४८ |
| १०. | **ऊसतोडणी कामगार महिलांच्या समस्या** - डॉ. मनीषा बनसोडे | ४९ - ५१ |
| ११. | **ऊसतोड कामगारांचे चित्रण करणारी कविता** - लता बिरू ऐवळे | ५२ - ५७ |
| १२. | **ऊसतोड कामगारांच्या समस्या व उपाययोजना** - डॉ. किशोर गिरीश नवले | ५८ - ६३ |
| १३. | **ऊसतोड कामगारांच्या सामाजिक व आर्थिक समस्या : एक अभ्यास** - प्रा. डॉ. भानुसे कारभारी लक्ष्मण | ६४ - ६७ |




Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| १४. | पश्चिम महाराष्ट्रातील ऊसतोड कामगारांच्या सामाजिक व आर्थिक समस्यांचा अभ्यास - डॉ. रोडगे कैलास दादासाहेब, डॉ. भोंडवे अंगद हरिभाऊ | ६८ - ७१ |
| १५. | मराठी कथा व कादंबऱ्यातून येणारे ऊस तोडणी स्त्री कामगाराचे चित्रण<br>- प्रोफेसर डॉ. जालिंदर कानडे | ७२ - ७५ |
| १६. | ऊसतोड कामगार स्त्रियांचा जीवनसंघर्ष मांडणारा कथनसंग्रह : 'झुंज तिची पाचटाशी' - डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे | ७६ - ८२ |
| १७. | ऊसतोड कष्टकरी समूहाचा हुंकार - हाणला कोयता झालो मास्तर!<br>- प्रा. डॉ. द.के. गंधारे | ८३ - ८६ |
| १८. | मराठी कवितेतील ऊसतोड कामगारांचे चित्रण<br>- प्रा. डॉ. युवराज धबडगे, प्रा. बोंतेवाड नागेश रामलू | ८७ - ९० |
| १९. | मराठी कादंबरीतून येणारे ऊस तोडणी कामगारांचे चित्रण<br>- प्रा. डॉ. चंद्रकांत प्रभाकर काळे | ९१ - ९४ |
| २०. | मराठी कवितेतून येणारे उसतोड कामगारांचे चित्रण<br>- प्रा. चांदण पोपट साबळे | ९५ - १०१ |
| २१. | मराठी साहित्यातून येणारे महिला ऊसतोड कामगारांचे चित्रण<br>- भारत कडू गायकवाड | १०२ - १०५ |
| २२. | ऊसतोड कामगारांच्या कवितेतील जाणीवा<br>- प्रा. बापूराव सहदेव डोंगरे | १०६ - १०९ |
| २३. | ऊसतोड महिला मजुरांच्या वेदनेची परिभाषा स्पष्ट करणारे लेखन 'झुंज तिची पाचटाशी' - प्रा. बालासाहेब विष्णू कटारे | ११० - ११४ |
| २४. | 'साखर फेरा' कादंबरीचे अंतरंग<br>- डॉ. बादलशाहा डोमाजी चव्हाण | ११५ - ११८ |
| २५. | ऊसतोड कामगारांच्या व्यथा आणि कथा<br>- डॉ. शिवाजी हुसे | ११९ - १२३ |
| २६. | मराठी कादंबरीतून येणाऱ्या ऊसतोड कामगारांच्या समस्या<br>- डॉ सुखदेव इघारे | १२४ - १२८ |
| २७. | 'सुर्वंता' - ऊसतोड महिला कामगाराच्या वेदनामय अनुभवविश्वाचे वास्तववादी चित्रण<br>- डॉ. सुजाता सचिन कुळकर्णी | १२९ - १३६ |




Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| २८. | ऊसतोड महिला कामगारांच्या समस्या<br>- रेणुका संजय नवगिरे | १३७ - १३९ |
| २९. | ऊसतोड महिलांच्या समस्या एक अभ्यास<br>- डॉ.नवनाथ ज्ञानोबा पवळे | १४० - १४४ |
| ३०. | ऊसतोड कामगार आणि मुलांचे शिक्षण - डॉ.संतोष जबाजी लगड*, अनिल नानाभाऊ खुरंगे**, डॉ. भारती मच्छिंद्र काळे*** | १४५ - १५३ |
| ३१. | हाणला कोयता झालो मास्तर : एक आकलन<br>- डॉ. अशोक डोळस | १५४ - १५९ |
| ३२. | मराठी साहित्यातील ऊसतोड कामगार<br>- डॉ. निता मेश्राम (पाटील) | १६० - १६५ |
| ३३. | ऊसतोड कामगारांच्या समस्या आणि उपाय<br>- डॉ. रंजना मधुकर कदम | १६६ - १७१ |
| ३४. | ऊसतोड महिला कामगारांच्या समस्या आणि उपाय<br>- प्रा.डॉ.संबोधी एम. देशपांडे | १७२ - १७५ |
| ३५. | मराठी कथेतील ऊसतोड कामगारांचे चित्रण<br>डॉ. रामलीला सुदामराव पवार | १७६ - १८१ |
| ३६. | मराठी कादंबरीतील ऊसतोड कामगारांचे चित्रण<br>- डॉ. आप्पा दत्तू माने | १८२ - १८५ |
| ३७. | ऊसतोडणी कामगारांच्या संघर्षमय जीवनाचा आलेख मांडणारी मराठी कादंबरी - डॉ. कैलास सोनू महाले | १८६ - १९१ |
| ३८. | मराठी साहित्यातून येणारे ऊसतोडणी कामगारांचे चित्रण<br>- डॉ. रत्ना जवरास | १९२ - १९६ |
| ३९. | ऊसतोड कामगार आणि मुलांचे शिक्षण : यसन<br>- प्रा.सुरेश लक्ष्मण नजन | १९७ - २०१ |
| ४०. | मराठी कथा, कादंबरीतून येणारे ऊसतोडणी कामगारांचे चित्रण<br>- राहुल शेलार | २०२ - २०८ |
| ४१. | समस्याग्रस्त अर्धा-कोयता एक अभ्यास<br>- प्रा. डॉ.वैशाली आहेर | २०९ - २१४ |




Scanned with CamScanner








# ऊसतोड कामगार आणि मुलांचे शिक्षण : यसन


**- प्रा. सुरेश लक्ष्मण नजन**

सहा. प्राध्यापक, मराठी विभाग

प्रवरा मेडिकल ट्रस्टचे आर्टस् कॉमर्स & सायन्स कॉलेज, शेवगाव


यसन ही ज्ञानेश्वर प्रकाश जाधवर यांची २०१९ ला प्रकाशित झालेली कादंबरी आहे. वामन आणि त्यांच्या कुटूंबाच्या माध्यमातून ही कादंबरी उलगडत जाते. विठ्ठबाप्पा सोनवणे या ऊसतोड मजुराच्या पोटी जन्म घेतलेल्या वामनच्या जगण्याच्या धडपडीच्या संघर्षाची कहाणी आहे. पूर्वार्धात ऊस तोडणी मजुरांचा संघर्ष, जीवन मांडलेले आहे तर उत्तरार्धात सेट, नेट पास होऊन विनाअनुदानित महाविद्यालयात प्राध्यापक पदावर नोकरीला लागूनही प्रत्येक वळणावर ठेचा खाव्या लागतात. व्यवस्थेनुसार वागावे लागते. या व्यवस्थेनेही माणसाला आकाळण्यासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष त्याला यसन घातलेली आहे. समाजात घडणाऱ्या वास्तव गोष्टींचे चित्रण या कादंबरीत लेखकाने केले आहे. ऊसतोड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या समस्या, त्यांचे होणारे हाल, कर्जाचा बोजा, उसतोडीमुळे पोरांना शिक्षण घेता येत नाही. 'यसन ही प्रत्यक्षात बैलाच्या नाकात असते. पण माणसाच्या आयुष्यातही कळत-नकळतपणे असंख्य प्रकारच्या यसनी टोचलेल्या दिसतात'[१]. त्याचबरोबर काबाडकष्ट करून शिक्षण घेऊन शिकलेल्या पोराच्या हाती काय लागते तर खाजगीत विनाअनुदानित प्राध्यापकाची नोकरी, वामन, बप्पा, माय, आय, नाना,



Scanned with CamScanner

काकू, सवुअक्का, योगिता, स्नेहल यांसारख्या पात्राच्या माध्यमातून कादंबरीचे कथानक उलगडत जाते. कादंबरीच्या सुरुवातीलाच नायकाच्या जन्माच्या वेळी आई-बाप ऊसतोडीसाठी फडात असल्याची माहिती आली आहे. एप्रिल महिना म्हणजे कडक उन्हाळ्याचा काळ होता. ऊस तोडतांना पाचट सारून ऊस तोडण्याचे काम चालू असते. आय पोटाशी असल्यामुळे नुसते वाढे गोळा करण्याचे काम करत होती. अचानक कळा यायला लागल्यामुळे तिला सरकारी दवाखान्याकडे घेऊन जातांना एका ऊसाच्या फडातील बायांना बोलवून आडोसा करून तिथेच तिचे बाळंतपण केले जाते. मुलगा होतो तोच पुढे या कादंबरीतील नायक वामन आहे. बाळंतपण झाल्यावर सरकारी दवाखान्यात नेऊन तिला सलाईन लावून चार दिवस ठेवतात त्यानंतर आठ दिवसांनी पट्टा पडून कारखाना बंद होतो. गावाकडं जाऊन आईच्या माय-बापाला नातू झाल्याचा निरोप दिला जातो. उन्हाळा संपल्यावर त्यांना माहेराला पाठवले जाते. आईचा बाप म्हणजे बापू आषाढी एकादशीला पंढरपूरला जाऊन आले होते. संतांचे आशीर्वाद चांगले असतात म्हणून नातवाचे नाव वामन ठेवतात. त्यासाली वामन व त्याचे आईवडील सोलापूरच्या कारखान्याला जातात. ऊसाच्या फडात झाडे नव्हती. म्हणून गाडीच्या दोन्ही चाकामधी पाळणा बांधला होता. बैलाच्या टकरीमुळे सगळी घाबरली. बैल धरून गाडीला बांधलेल्या झोक्यातून वामनला वाचवले. सादू आणि म्हादू ही बैलजोडी होती. बैल हुशार असल्यामुळे मोटारसायकल आडवी जाऊनही गाडी अपघातापासून वाचली. गावातला धनाप्पा तीन पोरींची लग्न आणि बायकोच्या पोटाचे ऑपरेशन करायला लागलेल्या खर्चामुळे कर्ज काढून लेक व सून घेऊन कारखान्याला येतो. ट्रकने धडक बसल्याने ऊसगाडी पलटी होऊन लेक-सुनाचा मृत्यू होतो.

कलमी आंब्याचा रस खाल्यामुळे वामनचे सगळे कुटुंब आजारी पडते. दवाखाना करून फरक होत नाही म्हणून "देवरशिनीचा अंगारा लावलं, नारळ लिंबू साऱ्यांच्या अंगावरून उतरून टाकलं"[२] दवाखान्याने फरक होत नाही म्हणून अंधश्रद्धेचा बळी ठरलेले ग्रामीण कुटुंब दिसते. कारखान्याला गेल्यावर सादू बैल विहिरीत पडतो. बागायतदाराच्या ट्रॅक्टरने बैल बाहेर काढून गाडीत माल कमी करून बप्पा कारखान्याकडे गाडी घेऊन जातो. मुकदमाची नजर वाईट असल्यामुळे पुढच्या साली त्याच्याकडे नको म्हणून जुन्या मुकादमाचे चार हजार व व्याज दोन हजार असे सहा हजार दुसऱ्या मुकादमाकडून उचल घेऊन दिले जातात.

वामन विठ्ठल सोनवणेला दुसरीच्या वयाचा असतांनी एक वर्ष बालवाडीत घालावे लागले. बालवाडीत सुकडी, भात, अंडी मिळत असे. घरी सादू बैल जागेचा उठत नाही. पोळ्याच्या दिवशी सादू उठत नसल्यामुळे म्हादूला घेऊन मिरवणूक काढली जाते. गार्यींसोबत लग्न लावले जाते. दुसऱ्या दिवशी सादू मरतो. घरी म्हाताऱ्या आजीला सगळी माय म्हणायचे. मायनं माळवं करून घर सांभाळले. वामन बालवाडीतून शाळेत जातो. वामनला कुत्र चावल्याने कारखान्यावर सरकारी दवाखान्यात सात दिवस बेंबीत इंजेक्शन दिले जाते. वामन प्रामाणिक असल्याचा प्रत्यय शाळेत पडलेले वीस रुपये गुरुजीकडे देतो यावरून येतो. माय रानातील माळवं इंजनाने भिजवायची, काही वेळेस माळव्याचे चांगले पैसे होतात. सवुअक्काला शाळेत दातखीळ बसल्यामुळे तिच्या अंगात देवी आहे. श्रावणाच्या शुक्रवारी सव्वासनी घालाव्या लागतील या अंधश्रद्धेपायी वामनच्या कुटुंबाला आर्थिक संकटाला सामोरे जावे लागते. "जवर माणसाला मानसिक आधार मिळत नाय तवर परंपरेची यसन सुटनं लय कठीण हाय"[३].

वामनच्या मामाच्या घराची भिंत कोसळून दोन्ही पोरांचा आश्रूबा, परसुबाचा मृत्यू होतो. मामीला दवाखान्यात ॲडमिट केलेले असते. वंशाला दिवा पाहिजे म्हणून मामाचे एका विधवेशी दुसरे लग्न लावले जाते. मामाचे मन रमत नाही. मानसिक खच्चीकरण होते आणि वैतागून एका दिवशी दिवाळीच्या सणात एड्रेल औषध पेऊन मरतो. मामाची बायको दोन महिन्याची गरोदर असते नंतर मुलगा होतो. वामन पाचवीत इंग्रजीचा अभ्यास करत असतो. शाळेतील अनेक प्रसंग त्यात



Scanned with CamScanner

कोपऱ्यातले पापुडे काढण्यातून सच्चाला विंचू चावतो. सातवीतल्या जिन्यान पोटात मारले म्हणून वामन त्याच्या डोक्यात दगड मारतो. त्याचबरोबर इंग्रजीत नापास झाल्यामुळे सांच्याला अभ्यासिकेसाठी रॉकेलवरची बॅटरी वामन तयार करतो. रानात विहीर खोदली तरी पाणी लागत नाही. त्यात पिठाची गिरणी सुरू केलेली होती. कर्जामुळे परत उचल घेऊन कारखान्यावर जावे लागते. गावातल्या एका जुन्या मंदिरात नंदीखाली पैसे आहे म्हणून ऐकल्याने वामन, वुल्या, पण्या आणि शिव्या नंदी पाडतात. पण काहीच सापडत नाही. गावात लोक दिवाळी करत होते आणि वामन, काका आणि काकू कारखान्यावर जातात. कारखान्यावर सामान घेण्यासाठी बारी, त्याचबरोबर काकाला ताप आल्यामुळे दवाखाना, त्यात वीस रुपये बाकी म्हणून चाबूक ठेवणे इ. प्रसंग घडतात. गावाकडे गुरुजी बप्पाला सांगायचे "वामनला साळात घाला तो हुशार आहे, त्याचं नुकसान करू नका."[४] बप्पा कारखान्याच्या कोपीवर येऊन वामनला शाळेत घेऊन जातात. आई-बाप ऊसतोड कामगार आहेत. कितीही अडचणी असल्या तरी ते वामनला शाळा शिकवण्याचा प्रयत्न करतात. बी.एड.च्या सरांकडून आदर्श विद्यार्थ्यांचे बक्षीस वामनला मिळते, सातवीची परीक्षा झाल्यावर कारखान्यावर जावे लागते, सवुअक्काचे लग्न होते, आठवीचे शिक्षण बोर्डींगमध्ये राहून वामन घेतो. नववीला चाऱ्याच्या शाळेत जातांना वामनला वायरच्या पिशवीचे दप्तर आणि खतांच्या गोणीचा घोंगटा होता. दैवशाला बोलण्यासाठी पत्र लिहिल्यावर घरी बप्पाचा मार खावा लागतो. शाळेत संस्थापकाच्या जयंतीनिमित्त विविध स्पर्धा, दहावीच वर्ष व परीक्षा केंद्र काटेगावला होते. पेपर संपल्यावर विहिरीवर, सडकावर रोजंदारीच्या कामाला वामन जात होता. या सगळ्या प्रसंगाबरोबरच पुढील शिक्षणासाठी पैसा पाहिजे तो काम करून मिळवण्यातील समजदारपणा वामनमध्ये दिसून येतो.

दहावीला ७२.८३% वामनला पडतात. अकरावीला आर्टस् ला प्रवेश घेतो. वसतिगृहासाठी तिसऱ्या यादीत नंबर लागतो. कॉलेजवर एन.सी.सी, दुकानात काम त्यानंतर एस.टी.डी.त काम केले. शकुंतलाबाई नावाची प्रतिभावंत गायक कलावंत सोबत ओळख झाली. बारावीचे पेपर झाल्यावर दोन महिने पुण्याला काम करण्यासाठी बालाजी, नरसिंग आणि वामन जातात. चांगले काम न मिळाल्याने तिरकुटात पैसे उडवून माघारी येण्यासाठी पाहुण्याकडून पैसे घेतात. बप्पासोबत माळवं धंद्यातील काम शिकून निकाल लागेपर्यंत माळवं विकायचे काम वामन करतो. माळवं विकताना वामन "घ्या भाजीपाला, खावा जीवाला ! एक नंबरची खासाल वांगी, तर आयुष्याची हुईल चांदी! शेतकऱ्यांचा माल हाय, घिऊन जावा भेंडी मग बगा कशी खनखनताय किचनमधली भांडी !"[५] असे बोलवून गिऱ्हाईक आपल्याकडे वळवत असतो.

बारावीला ७४.८३% पडून बी.एड ला नंबर लागत नाही म्हणून घरच्यांचे बोलणे ऐकण्यापेक्षा तो बी.ए.ला प्रवेश घेतो. बारशीला आल्यानंतर कथा-कथनाचा, प्रबोधनाचा कार्यक्रम घेऊन त्यातून पैसे मिळवतो. त्यासाठी कधी मुख्याध्यापकाची परवानगी, शिक्षण अधिकाऱ्याची परवानगी तो घेतो. असे मिळून तो २४ कार्यक्रम करतो. चालूमध्ये सरकारी नोकरीसाठी वामन अर्ज करतो. मिळेल ते काम करत राहतो. एस.वाय.ला गेल्यानंतर एन.एस.एस.ला प्रवेश त्यातून पुढे सूत्रसंचालन, कॅम्प, स्वच्छता, पथनाट्य इ. कामे वामन करतो. कॉलेजमधून वामन आणि त्यासोबत चार जण अशी पाच जणांची राज्यस्तरीय शिबिरासाठी निवड होते. बाहेरच्या कार्यक्रमात फसवणूक होत असल्यामुळे वामन कार्यक्रम बंद करतो.

बी.ए. करून तो पुण्याला एम.ए. प्रवेशासाठी जातो. वसतिगृहासाठी सहाय्यक समिती, समाजकल्याण मंत्रालय, मुबंई येथे जातो. मुलाखत झाल्यानंतर चौथा पार्टनर म्हणून ३०४ रूममध्ये त्याचा नंबर लागतो. मेसमधील काम, कमवा व शिका, ही काम वामन करू लागला. त्याचबरोबर सूत्रसंचालन, स्टेजची व्यवस्था, विद्यार्थी प्रमुख या जबाबदाऱ्या स्वीकारत जागृती यात्रेसाठी वामनची निवड होते. यात्रेत योगिता नायगावकर नावाच्या मुलीसोबत ओळख होते. हळूहळू



Scanned with CamScanner

दोघांना एकमेकांचे विचार पटतात. त्यानंतर फोनवर बोलणे चालू राहते. अहमदनगरमध्ये व्यक्तिमत्त्व विकासाच्या कार्यक्रमात ठरवून नोंदणी करून ते दोघे पाच दिवस सोबत राहतात. एम.ए. फस्ट क्लासमध्ये झाल्यावर पॉलिटेक्निकमध्ये दहा हजारांवर नोकरी मिळते. नोकरीची बदली झाल्यावर एका डिव्हिजनची वर्गशिक्षक म्हणून जबाबदारी वामनवर पडते. प्राचार्य शर्माबाईच्या वैयक्तिक कामास वामन नकार देतो. इतर जातीच्या मुलीसोबत लग्नाची परवानगी बप्पा व आय देतात पण वामन खालच्या वर्गातला आहे म्हणून योगिताचे वडील नकार देतात. योगिताचे एका व्यावसायिकाशी लग्न ठरते. वामन सेट, नेट परीक्षा पास होतो. गावाकडे वामनला अनेक स्थळ येतात. जमतात, मोडतात नंतर बीडच्या पाहुण्याच्या मुलीबरोबर लग्न जमते. वामनचा मित्र शरद डी.एड. होऊन पुढं परमनंट होईल म्हणून तीन हजारांवर नोकरी करतो. पण नंतर रजा पडल्याने नोकरी जाते, तसेच एका पाहुण्याला संस्थेला १००% अनुदान मिळाल्यावर काढून टाकले जाते व त्याच्या जागेवर संस्था चालकाचा पाहुणा घेतला जातो. पाहुण्यांची बायको नोकरी करत असतांना संस्थाचालक जबरदस्तीने अत्याचार करतो त्यामुळे ती आत्महत्या करते.

१५ मे २०१६ ला वामनचे स्नेहलशी लग्न पार पडते. मोबाईल पाहिल्यावर कळते की, उन्हाळी सुट्टी फक्त पंधरा दिवस देऊन बाकीची सुट्टी रद्द केली जाते. "ज्या संस्थेसाठी गांडीला पाय लावून पळत व्हतो. त्याच संस्थेतील दिसायला सज्जन लोकांनी माझा घात केला व्हता. ज्यांच्यावर म्या अवलंबून व्हतो. त्यांनीच दगा दिला व्हता. कायद्याचे नियम गुंडाळून ठिवले व्हते. स्वतःला स्वतःच राग यायला लागला व्हता. धंदेवाल्या गाडीवानाच्या हातात यसन गेल्यावर बैलाच्या नाकातोंडातून रगत आल्याशिवाय राहत नाय"[६]. यातून वामनची तळमळ व्यक्त होते. पगार थकल्यामुळे ३० प्राध्यापक उपोषण करतात त्यांच्या मागण्या मान्य करून वामनकडे अनेक जबाबदाऱ्या दिल्या जातात. त्यातून शिक्षण शुल्काच्या कामात घोटाळा झाला म्हणून वामनला टर्मिनेट केले जाते. उपोषणाला बसलेल्यापैकी २० लोकांना वामनसह काढून टाकले जाते. संस्थेच्या विरोधात जाऊन केस करून संस्थाचालक आपल्या हाताला काही येऊ देणार नाही त्यामुळे वामन खचतो. घरभाड्यापुरते काम क्लासला मिळते व जवळ असलेल्या पैशात चहाचे हॉटेल तो टाकतो. "एवढं सारं शिकूनसुद्धा शेवटी नाकातली यसन वुलसिकच ढीली झाली पन सुटली नाय असंच वाटतंय. ज्याच्या हातात यसनीचं दावं ! त्यानंच पोट भरून तुपाशी खावं !! आन ज्याच्या नाकात यसनीचं दावं ! त्यानं उपाशी राहावं !!"[७]

शेतकऱ्याने प्राणी आपल्या उपयोगितेसाठी पाळले, त्यात गाय, बैल, म्हैस यांच्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी नाकात वेसन घातली जाते. या कादंबरीतून स्वतःच अस्तित्व पुसलेल्या माणसांची दुःखे मांडली आहेत. व्यवस्थेने शिक्षणप्रणालीवर आपले वर्चस्व प्रस्थापित केलेले आहे, ही समाजातील वास्तव परिस्थिती या कादंबरीतून मांडलेली आहे. "पारंपारिक शिक्षणाच्या पदव्या घेऊन सेट, नेट सारख्या परीक्षा पास होऊनही पुढचे भविष्य अंधारात आहे, या शिक्षणव्यवस्थेच्या प्रक्रियेत आत्मविश्वास, आत्मसन्मान हरवून बसलेल्या आजच्या तरुण पिढीची ही कहाणी आहे"[८]. कितीही अडचणी आल्या तरी संघर्ष करून शिक्षण घेऊन त्याचा फायदा काय, असा समाजातील वास्तव प्रश्न या कादंबरीच्या माध्यमातून नायकाने मांडलेला आहे. ऊसतोड कामगारांचा मुलगा कादंबरीचा नायक वामन सोनवणे एम.ए. इंग्रजी, सेट-नेट परीक्षा पास आहे. विनाअनुदानित पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काम करतो. वामन आणि ऊसतोड करणारे त्याचे कुंटुंब यांचा संघर्ष ही कादंबरी आहे. दुष्काळी भागातील ऊसतोड मजुरांच्या जन्मापासून ते उच्चशिक्षित होण्याचा हा प्रवास अतिशय दुःखमय असा आहे. उसतोडीचे दुःख आपल्या मुलाच्या वाट्याला येऊ नये, त्याच्या हातात कोयता येणार नाही यासाठी शिक्षण घेऊन या परिस्थितीतून बाहेर पडू असा आत्मविश्वास या वामनच्या आईवडिलांना असतो. वामनला उभा करण्यासाठी ते आयुष्यभर झडतात. पण शेवटी विश्वास



Scanned with CamScanner

तडाला जातो. या शिक्षणव्यवस्थेत भ्रष्टाचार हा मुळापर्यंत पोहोचलेला आहे. वामनचा पाहुणा काम करत असलेल्या संस्थेला १००% अनुदान मिळाल्यावर पाहुण्याला काढून त्याजागी संस्थापकाचा पाहुणा घेतला जातो. इतके दिवस संस्थेशी एकनिष्ठ राहून काम करून शेवटी त्याला काढले जाते, ही समाजामध्ये सध्या प्राध्यापक म्हणून काम करत असलेल्या तरुण प्राध्यापकाची वास्तव परिस्थिती कादंबरीमध्ये मांडलेली आहे.

"ऊसतोड मजुरांच्या जीवनाची अनिश्चितता आहे. साप चावून मृत्यू होऊ शकतो तर कधी छोट्या-मोठ्या अपघाताने मृत्यू येऊ शकतो"[९]. ऊसतोड कामगारांना जीवनाची शाश्वती नाही. २००० नंतरच्या काळातील सुशिक्षित होऊन हाती काहीही न मिळालेल्या, पाच-दहा वर्षे विनाअनुदानित कॉलेजवर नोकरी करून काहीही न मिळालेल्या २० वर्षातील तरुणांच्या अख्या पिढीची ही कादंबरी आहे. "शिक्षक, कर्मचारी यांच्या भविष्याबद्दल अंधार आहे, अनुदानित संस्थांमध्ये भ्रष्टाचाराचा कळस झाला आहे"[१०]. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात शिक्षकांच्या जागाचा लिलाव सुरू होतो. ज्यांच्याजवळ पैसा नाही ते या व्यवस्थेचा बळी ठरतात. पात्रता, ज्ञान असूनही सुशिक्षित नोकरीपासून वंचित राहतो. या कादंबरीची रचना आत्मचरित्रात्मक आहे. कादंबरीतील भाषाशैली संवादी, बोली रूपातील आहे. घटना-प्रसंग ताकदीने उभे राहतात. प्रवाही लेखनशैली असल्यामुळे हे कथानक मनाची पकड घेते. बैलाच्या नाकात त्याला आकाळण्यासाठी जशी वेसन टोचली जाते. तशीच या व्यवस्थेने विनाअनुदानित प्राध्यापकांच्या, शिक्षण घेऊन नोकरीसाठी फिरणाऱ्या, तरुणांच्या नाकात वेसन टोचलेली दिसते. एकंदरीत समाजामध्ये घडणाऱ्या गोष्टीचे वास्तव चित्रण वामन, गजा, पाव्हणा या सुशिक्षित तरुणांच्या माध्यमातून केलेले आहे. नोकरीसाठी तडफड करून, संस्थेच्या कामात एकनिष्ठ राहून शेवटी काढून टाकले जाते. हीच आजची समाजातील दाहक वास्तव परिस्थिती आहे. शिक्षणव्यवस्थेतील भ्रष्टाचार, त्यातुन वाटयाला आलेले दुःख, निराशा या कादंबरीत दिसते.

**संदर्भ :**


१. गणपतराव ढेंबरे, जागतिकीकरणाच्या रेट्यात उभ्या राहिलेल्या नव्या व्यवस्थेतील अख्या पिढीची कादंबरी, अक्षरनामा, ०९ जानेवारी २०२१
२. ज्ञानेश्वर जाधवर, यसन, स्वयंदीप प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २० डिसेंबर २०१९ पृ.क्र. २१
३. तत्रैव, पृ.क्र. ६३
४. तत्रैव, पृ.क्र. ८५
५. तत्रैव, पृ.क्र. १४०
६. तत्रैव, पृ.क्र. २५२
७. तत्रैव, पृ.क्र. २६०
८. आनंद विंगकर, मानसिक घुसमटीचं यसन, दैनिक दिव्यमराठी
९. उमेश मोहिते, ऊसतोड मजुरांच्या संघर्षाचा वेध, महाराष्ट्र टाईम्स, १९एप्रिल २०२०
१०. शब्दांकन दीपाली केदार, ज्ञानेश्वर जाधवर यांची मुलाखत, मासिक आणि न्यूजपोर्टल अभ्यासमंत्र , ११ सप्टेंबर २०१९




** ** **



Scanned with CamScanner

MAH MAR 34737/13/1/2009-TC
ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

## तांडे निघती रानात

लावूनी मेळ सारा तांडे निघती रानात
एक होऊनी जोमात जीव तोडती फडात ।।धृ।।

ऊस तोडता तोडता काळ लोटतो फडात
धन्य माऊलीची कूस नाळ जोडतो कष्टात
माता मुकदमा बोले नको सतावू मला
झाला जड जीव बाळ खेळतो पोटात ।।१।।

मनोभावे रातदिन देव कोयता पूजला
विळा धारदार हाती तोच आधार जिवाला
मोळी फेकून पडता पाचटीच्या अंथरुणाला
लाथा मारी चिमुकला ओटी भरल्या पोटात ।।२।।

भेगाळली भुई रानं गेली करपून
झालं चाळणी शिवार पाणी उपसून
नाही उरलं टिपूर तांडे चालती अजून
जुनी उचल देऊन नव्या कामाच्या शोधात ।।३।।

– श्रावण गिरी



Scanned with CamScanner

त्रैमासिक 'तिफण', भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद, औरंगाबाद आणि बाबूजी आव्हाड महाविद्यालय, पाथर्डी जि. अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने, आयोजित




# ।। राष्ट्रीय चर्चासत्र ।।

## विषय : मराठी साहित्यातील ऊसतोड कामगारांचे चित्रण

पार्थ विद्या प्रसारक मंडळ



त्रैमासिक 'तिफण' ऊसतोड कामगार विशेषांकाचे प्रकाशन
रविवार, दि. २४ सप्टेंबर २०२३

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, प्रा. / डॉ. सुरेश लक्ष्मण नजन यांनी दि. २४ सप्टेंबर २०२३ रोजी मराठी साहित्यातील ऊसतोड कामगारांचे चित्रण या विषयावर आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी ऊसतोड कामगार आणि मुलांचे शिक्षण या विषयावर शोधनिबंध वाचन / प्रमुख पाहुणे / सभाध्यक्ष / अध्यक्ष म्हणून उपस्थित : चसन राहून मार्गदर्शन केले. याबद्दल हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| डॉ. जी.पी. ढाकणे<br>(प्राचार्य) | डॉ. सुभाष शेकडे<br>(मराठी विभागप्रमुख) | डॉ. सर्जेराव जिगे<br>अध्यक्ष, भा.सा.,सं.आणि सं.परिषद | डॉ. अशोक डोळस<br>(मराठी विभाग) | डॉ. शिवाजी हुसे<br>(संपादक, तिफण) |

Scanned with